थोडक्यात

करजगाव: शाळेच्या पहिल्याच दिवशी जि.प. शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत करताना उपसरपंच जावेद खॉ, ताहेर खॉ, जि.प. सदस्य सुधाकर उईके व अन्य मान्यवर

सखुबाई वरघट यांचे निधन

विचोरी : येथील प्रतिष्ठित नागरिक बबनराव वरघट यांच्या मातोश्री सखुबाई वरघट यांचे दीर्घ आजाराने नुकतेच निधन झाले. त्या ८० वर्षाच्या होत्या. त्यांच्यापश्चात ६ मुले, २ मुली, सुना, नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

धानोरा मुगल येथे महिलेचा विनयभंग

नांदगाव खंडेश्वर : पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या धानोरा मुगल येथील ३५ वर्षिय महिला ही तीच्या घरात एकटी असताना आरोपी निलेश रमेश देशमुख (२२) याने तीच्या घरात प्रवेश करून तीचा विनयभंग केला. ही घटना २२ जून रोजी सायंकाळी घडली. या प्रकरणी ५ जुलै रोजी महिलेने तक्रार दाखल केली. त्या तक्रारीवरून आरोपी निलेशविरूद्ध गुन्हा दाखल केला.

पूर्णानगर येथे कुमारिकेचा विनयभंग

आसेगाव पूर्णा : १९ वर्षिय कुमारिकेचा विनयभंग केल्याची घटना पूर्णानगर येथे आज दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली.

आमिन शेख टॅक्सीवाला (४०) रा.पूर्णानगर असे आरोपीचे नाव आहे. आठवडी बाजार परिसरात राहणारी एक कुमारिका शौचास गेली असता आमिन शेखने तेथे जाऊन तीचा विनयभंग केला. या घटनेची तक्रार मुलीच्या आईने आसेगाव पोलिसात दिली असता पोलिसांनी आरोपी आमिन शेखविरूद्ध भादंविच्या कलम ३५४ अ (२) अन्वये गुन्हा दाखल करून त्यास अटक केली आहे.

भिंत बांधण्याच्या कारणावरून इसमाचे काठीने डोके फोडले

अंजनगाव सुर्जी : भिंतीवर बांधलेली भिंत पाडल्यामुळे आरोपीने काठीने डोके फोडून जखमी केल्याची घटना टाकरखेडा मोरे येथे ५ जुलै रोजी दुपारी घडली.

शेषकन्या वाकोडे (५०) असे फिर्यादी महिलेचे नाव आहे. आरोपी निलेश अनंतराव गोले (३०) याने बांधलेल्या भिंतीवर शेषकन्याने भिंत बांधण्याचा प्रयत्न केला; मात्र निलेशने त्याला विरोध केला असता झालेल्या वादात आरोपी निलेशने शेषकन्या वाकोडेच्या डोक्यावर काठीने मारून जखमी केले तसेच जीवे मारण्याची धमकी दिली.

बेडरूम मधून पर्स लंपास

परतवाडा : बेडरूममधील दिवाणवरील गादीखालून ३० हजार रुपये रोकडसह पर्स लंपास केल्याची घटना ब्राह्मणसभा कश्यपलाड येथे घडली.

संकेत विनोद ठाकरे (२४) रा.इसापूर असे फिर्यादीचे नाव आहे. संकेत ठाकरे हे आपल्या कुटुंबासह बाहेरगावी गेले असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या कश्यप प्लॉट येथील घराच्या दरवाजाचा कोंडा तोडून आतील बेडरूममधील गादीखालून ३० हजार रुपये नगदी रक्कम असलेली पर्स चोरून नेली.

वरूड बगाजी धरणातून लाखोची दारू जप्त

- धरणातील बेटावर पोलिसांची कारवाई
- गुन्हे शाखेकडून पहिल्यांदाच बोटीचा वापर

स्थानिक प्रतिनिधी / ६ जुलै

अमरावती : धरणाच्या जलक्षेत्र परिसरात असलेल्या बेटावरील दारू अड्डयावर धाड टाकण्यासाठी गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पहिल्यांदाच बोटीचा वापर करून लाखो रूपयांची दारू व मोहसडवा जप्त केल्याची घटना ६ जुलै २०१५ रोजी घडली.

वरूड बगाजी परिसरात काही इसम हातभट्टी दारू काढून जिल्ह्यात विक्री करत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पोलिसांना प्राप्त झाली. या गावठी दारूमुळे परिसरातील महिला, मुली तसेच शालेय विद्यार्थ्यांना त्रास होत असल्याच्या तक्रारी पोलिस अधिक्षक कार्यालयाला प्राप्त झाल्या होत्या. त्या तक्रारीची गांभीर्याने दखल घेत पोलिस अधिक्षक लखमी गौतम यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे अधीकारी व कर्मचारी यांच्या मदतीने आज ६ जुलै रोजी धरणाच्या मध्यभागी असलेल्या एका बेटावर धाड टाकली. ही धाड पोलिसांनी बोटीच्या साहाय्याने टाकली. पोलिसांनी धाड टाकताच आरोपी दीपक शिवरकर, भालचंद्र पाटणकर, [illegible] बगाजी यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ३५ ड्रम दारू निर्मितीसाठी असलेले साहित्य, ६ हजार ६०० रूपये मोहासडवा व इतर साहित्य असा एकूण १ लाख ५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलिस निरीक्षक सुधीर हिरडेकर, सहायक पोलिस निरीक्षक नागेश चतरकर, पी.सी.अरूण मेटे, अनिल वासनिक, त्र्यंबक मनोहरे, सुनील महात्मे, सचिन मिश्रा, शकील चव्हाण, ज्ञानेश्वर सहारे, प्रदीप काळपांडे, गजेंद्र ठाकरे, प्रवीण अंबाडकर, चेतन दुबे, नितीन शेंडे व शोभना वासनिक यांनी केली. हे ठिकाण अत्यंत दुर्गम ठिकाणी असल्यामुळे पोलिसांना बरीच कसरत करावी लागली.

धाडीत मोहासडवा नष्ट करताना पोलिस पथक

संत्रा पीकाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याची गरज - प्रो. जे. आदिनारायणा

मार्गदर्शन करताना आदिनारायणा व अन्य

कार्यक्रमाला उपस्थित संत्रा उत्पादक शेतकरी

स्थानिक प्रतिनिधी / ६ जुलै

अमरावती : पाणी, मृदा आणि हवामान यामध्ये सतत होणारे बदल पिकाच्या वाढीवर आणि उत्पादनावर परीणाम करतात, हे बदल अचूकरित्या ओळखणे आणि त्यांचा दुष्परीणाम टाळण्यासाठी उपाय व माहिती करून घेणे ही काळाची गरज आहे. माहिती संप्रेषण/संपर्क तंत्रज्ञानाचा वापर करून संत्रा पिकामधील पाणी, कीड/रोग व्यवस्थापनासारख्या महत्वांच्या विषयावर आधारित संशोधन आणि सेवांचा विस्तार करणे गरजेचे असून संत्रा पिकाला तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन आय.आय.टी. मुंबईचे शास्त्रज्ञ डॉ.जे. आदिनारायणा यांनी केले. कृषी उत्पन्न बाजार समिती वरूड येथे आयोजित केलेल्या कार्यशाळेमध्ये ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर आय. आय. टी. हैदराबादचे प्रो. के. बी. वी. न. फणीद्रा, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे डॉ. गाडे आणि टाटा कन्सल्टन्सी सर्विसेसचे डॉ. भू. जज्ञासी यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या सविस्तर मार्गदर्शनामध्ये डॉ. आदिनारायण यांनी भूजल पाणी वापर आणि व्यवस्थापन, संत्रा पिकातील सिंचन आणि पाणी व्यवस्थापन, संत्रा पिकांवरील कीड/रोग व्यवस्थापन करणे आणि यंत्रणा उभारण्यासाठी इट्रा प्रकल्प पुढे येणार आहे. या शेतकरी मेळाव्यास वरुड तालुक्यातील बहुसंख्य शेतकरी, विद्यार्थी आणि शास्त्रज्ञांची उपस्तिथी होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाराष्ट्र राज्य संत्रा उत्पादन संघाचे रमेश जिचकार यांनी केले. संत्रा पिकाच्या उत्पादन वाढीसाठी माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पाणी आणि कीड/रोग व्यवस्थापन या विषयावरील संशोधनासाठी बेनोडा, गोरेगाव, नागझिरी, बारगाव येथे संशोधनाकरिता स्वयंचलित हवामान केंद्र बसविण्यात आलेले आहे. सदरील कार्यशाळेत रत्नाकर अहेर, बाबाराव इंगळे, बबनराव पेलागडे, बाळासाहेब कोहळे, प्रकाश वानखडे, रवींद्र वानखडे, गौरीशंकर म्हसकी, कृषी समृद्धीचे राहुल गुडघे, रमेश भोंडे, संजय पावडे, श्रीकांत काळे, घनश्याम भोपती, राजाभाऊ कराळे, श्रीधरन मानकर व बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक रणधुमाळीला प्रारंभ

६६ उमेदवारांचे नामांकन दाखल

तालुका प्रतिनिधी / ६ जुलै

चांदूर रेल्वे : तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीचे नामांकन भरण्यात शेवटच्या दिवशी एकूण ७२ अर्जांची उचल झाली असून ६६ उमेदवारांनी आपले नामांकन दाखल केले. यामध्ये भाजप प्रणित शेतकरी पॅनलला उद्योजक दिलीपबाबू गिरासे यांच्या नेतृत्वाताने एक प्रकारची नवसंजिवनी मिळाल्याची चर्चा परिसरात ऐकावयास मिळत आहे.

चांदूर रेल्वे तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीच्या रणधुमाळीला आज खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. आज नामांकन दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी भाजप प्रणित शेतकरी पॅनलने शेकडोच्या संख्येने माजी आ.अरूण अडसड, उद्योजक दिलीपबाबू गिरासे यांच्या नेतृत्वात नामांकन दाखल केले. स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एकूण १८ संचालक राहणार असून यामध्ये सेवा सहकारी सोसायटी गटातून ११ संचालक, ग्रामपंचायत गटातून ४ संचालक व्यापारी व आडते मतदार संघातून २ संचालक व हमाल मापारी मतदारसंघातून १ संचालक निवडून देणे आहे. सोसायटी मतदारसंघातून ३७३ एवढे मतदार आहे. ग्रामपंचायत मतदारसंघातून ३७८ मतदार मतदान करणार आहे, तर व्यापारी व आडते मतदार संघात एकूण मतदार ८१ व हमाल मापारी मतदार संघात ३९ मतदार आहे.

आज शेतकरी पॅनलच्या अर्ज दाखल करण्याच्या वेळेस राजाभाऊ देशमुख, बबनराव गावंडे, जुरावरखॉ पठाण, किशोर कडू, जयपाल जयस्वाल, वामनराव राठोड, अशोकराव देशमुख, मनोहर वाघ, रावसाहेब शेळके, अरूण वानखडे, अमोल देशमुख, विद्यासागर होले, बंडुभाऊ यादव, छोटु देशमुख, सुरेश यादव, उत्तमराव ठाकरे, ॲड.किशोर झाडे, मोहन ठाकरे, नरेश कोरडे, गजानन यादवसह शेकडो कार्यकर्ते सामिल झाल्याचे चित्र दिसत होते.

हनुमान मंदिरातून चांदीचा मुकुट लंपास

मंदिरातील मुकुटविना असलेली मूर्ती

प्रतिनिधी / ६ जुलै

नांदगाव पेठ : येथील काळामारोती संस्थानमधून शनिवारी दिवसाढवळ्या अज्ञात भामट्याने चाळीस हजार रूपये किमतीचा चांदीचा मुकुट चोरून नेल्याची घटना घडली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की नांदगाव पेठ येथे पुरातन काळा मारोती मंदिर आहे. शनिवार असल्याने सकाळपासूनच भक्तांची वर्दळ होती. साडेबारा वाजताच्या दरम्यान काही भक्तांच्या मुकूट नसल्याचे लक्षात आल्यावर सर्वत्र हल्लाकल्लोळ झाला. जवळपास ७५० ग्रॅम वजनाचा व चाळीस हजार रूपये किमतीचा तो मुकूट असून अज्ञात भामट्याने अलगद हात मारल्याने हनुमान भक्तांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

भक्तांनी आजुबाजूला चौकशी केली तेव्हा सुशिक्षित दिसणारा सावळा तरूण शेवटी दर्शन घेऊन गेला असे लक्षात आले; मात्र स्थानिक नसल्याचे अनेकांनी सांगितले. याबाबत प्रभात अग्रवाल, नितीन हटवार, नवीन अग्रवाल यांच्यासह दहा ते बारा भक्तांनी पोलिस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली. पोलिस उपनिरीक्षक महेश खुळे यांनी अज्ञात भामट्याविरूद्ध भादंवि कलम ३८० अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.

दोन वर्षापूर्वी गदा चोरी

दोन वर्षापूर्वी याच मंदिरातून चांदीची गदा चोरी गेली होती. त्याचा तपास अजूनही अपुर्णच असून आज घटनेची पुनरावृत्ती झाली. चोरींच्या घटनांना कुठल्याच प्रकारे आळा बसत नसल्याने चोरट्यांचे चांगले फावत आहे.

तुळजापूर घाटातील रेती गेली कुठे ?

युवा सेनेचा सवाल

वार्ताहर / ६ जुलै

राजूरवाडी : मोर्शी तालुक्यात घाटावरील रेती चोरून नेण्याच्या घटना सलग सुरूच असताना तुळजापूर घाटावरील रेती तहसीलदारांनी कारवाई दरम्यान जमा केली असता ती आता गेली कुठे, असा सवाल युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. तसे निवेदन त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविले आहे. मोर्शी तालुक्यात रेती तस्करीत शासनाला लाखोंचा चुना लागत आहे. याकडे स्थानिक एसडीओ व तहसीलदारांचे दुर्लक्ष आहे. तालुक्यातील काही रेती घाटांचा लिलाव झाला नसूनसुद्धा तस्करांनी शेकडो ब्रास रेती चोरून नेण्याचा सपाटा लावला आहे. तुळजापूर घाटामध्ये मोठ्याप्रमाणावर रेतीसाठा होता.

त्या घाटाचा लिलाव महसूल विभागाने केला नव्हता. तरीही रेती चोरून नेण्यात आली होती. त्या रेती साठ्यावर कारवाई करून अधिकाऱ्यांनी दोन ब्रास रेती जंगलाच्या किनाऱ्यावर जप्त केली होती; मात्र ती रेती तस्करांनी चोरून नेली. अशाच प्रकारे अनेक ठिकाणावरून जप्त केलेली रेती चोरट्यांनी चोरून नेली. मग अशा चोरी गेलेल्या रेतीचे काय, असा प्रश्न जनता प्रशासनाला विचारत आहे.

शेतकऱ्यांच्या शेतातील सिंचन साहित्याची चोरी

वार्ताहर / ६ जुलै

कारला : अंजनगाव सुर्जी तालुक्यातील कारला येथील शेत शिवारात अज्ञात चोरट्यांनी सिंचन साहित्य चोरून नेल्याच्या घटनांमुळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शेतकरी भाष्करराव वानखडे यांची केळीची बाग आहे. या बागेतील सिंचन साहित्य शेतकऱ्यांनी चोरून नेले आहे. ही घटना ६ जुलै रोजी रात्रीच्या दरम्यान घडली. त्या अगोदर ५ जुलै रोजी चोरट्यांनी डॉ.आनंदराव चिंचोळकर यांच्या ४ एकर शेतातील ठिंबक सिंचनाच्या नळ्या चोरून नेल्या. या घटनेत चिंचोळकर यांचे हजारो रूपयांचे नुकसान झाले. गेल्या काही दिवसापुर्वी केळी उत्पादक शेतकरी चंद्रसेन वानखडे यांच्या शेतातूनसुद्धा चोरट्यांनी ठिंबक सिंचनाचे पाईप चोरून नेले आहे.

परिसरात शेतकऱ्यांचे हजारो रूपयांचे साहित्य अज्ञात चोरटे शेतातून चोरून नेत आहेत. यासंदर्भात अंजनगाव पोलिसात तक्रारीसुद्धा दाखल केल्या आहेत; परंतु त्याची चौकशी पोलिसांनी केली नाही. पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त लावून शेतशिवारातील चोऱ्या थांबवाव्या, अशी मागणी कारला परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

अचलपूर बाजार समिती निवडणुकीकरिता ३९ उमेदवारांची माघार

४२ उमेदवार आजमावणार भाग्य

तालुका प्रतिनिधी / ६ जुलै

परतवाडा : अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीकरिता ३९ उमेदवारांनी निवडणुकीमधून माघार घेतली आहे. त्यामुळे ४२ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. निवडणूक कार्यक्रमानुसार ६ जुलै हा उमेदवारी मागे घेण्याचा दिवस होता. त्यामुळे उमेदवारी अर्ज कोण मागे घेणार याबद्दल सहकार क्षेत्रामध्ये जोरदार उत्सुकता होती. निवडणूक अर्ज मागे घेणाऱ्या उमेदवारामध्ये सेवा सह. सो. मधून कैलास आवारे, अजय उभाड, रमेश कडू, प्रभाकर काळे, राजेंद्र गोरले, गंगाधरराव चौधरी, विलास चौधरी, प्रभुदास ठाकरे, धनंजय तट्टे, बाळकृष्ण थुटारे, नरेंद्र पडोळे, राजेंद्र पवार, सतीश पाटील, गजानन बानाईत, शिवनाथ सगणे, साहेबराव हुड, सौ.अर्चना राजेंद्र पाटील, सौ.सुषमाताई दीपक पाटील, सेवा सहकारी इतर मागासमधून कैलास आवारे, विलास चौधरी, सतीश पाटील, गजानन बानाईत, गजानन भोरे, अभिजित हरणे, सहकारीी संस्था वि.जा. भ.ज. मधून महेंद्र नागे यांचा समावेश आहे.

ग्रा.पं. सर्वसाधारणमधून अनिस खॉ युनूफखा, अनुप अरबट, सौ.माधुरी प्रतिन कडू, संदीप काठोळे, धनराज धोम, संजय चरोडे, हिम्मतराव डवंगे, सौ.अश्विनी प्रवीण तायडे, सुधीर रहाटे, सौ.साधना महेंद्र रोडे, अडते व्यापारी मतदारसंघातून चैतन्य पाटस्कर, हमाल तोलारी मतदारसंघातून अंबादास मरकाम, शे.मजीद शे.हसन, गणेश शेजव यांचा निवडणूक अर्ज मागे घेणाऱ्या उमेदवारांमध्ये समावेश आहे.

३९ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने ४२ उमेदवार रिंगणात आहेत. त्यामध्ये सोसायटी सर्वसाधारणमधून दिलीप अपाले, विजय काळे, बाबुराव गावंडे, दीपक चऱ्हाटे, संजय चरोडे, अमोल चिमोटे, सदानंद जयस्वाल, अशोक जवंजाळ, आनंद थुळधर, अजय पाटील, दीपक पाटील, रवींद्र पाटील, गजानन भोरे, रमेश मडघे, चंद्रकांत म्हाला, गोपाल लहाने, अभिजित हरणे, सौ.छाया प्रभाकरराव काळे, सौ.वर्षताई नरेंद्र पवित्रकार, सौ.किरण दिलीप शेळके, सौ.उषा राजेंद्र सगणे, सोसायटी इतर मागासमधून गंगाधरराव चौधरी, बाळकृष्ण थुराटे, शिवाजी सुभाष पाटील, सोसायटी विजा, भज मधून गंगाराम काळे, साधुराम येवले, ग्रामपंचायत सर्वसाधारणमधून अजय उभाड, राजेंद्र गोरले, मनोहर जाधव, संदीप ठाकरे, नरेंद्र पडोळे, राजेंद्र मुंदे, ग्रामपंचायत अनु.जाती जमातीमधून आनंद गायकवाड, सौ.सुषमा भारत थोरात, विनायक सरदार, ग्रामपंचायत आर्थिक दुर्बलमधून सौ.अश्विनी प्रवीण तायडे, सुधीर रहाटे, अडते व्यापारीमधून बंडू अग्रवाल, सतीशबाबू व्यास, गोविंद सिरोया, हमाल तोलारी मतदारसंघातून पोपट घोडेराव, शेख हबीब शेख हसन यांचा समावेश आहे.

रेवसा येथील पाण्याची टाकी कोसळण्याची शक्यता

- टाकी खालील रहिवाशांच्या जिवाला धोका
- पाणीपुरवठा विभाग व ग्रा.पं.चे दुर्लक्ष

वार्ताहर / ६ जुलै

रेवसा : येथे गावाला पाणीपुरवठा करणारी पाण्याची टाकी शिकस्त झाल्यामुळे ती कोसळण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे टाकीच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या जिवितास धोका उद्भवला आहे. हा प्रकार स्थानिक ग्रा.पं. ला माहित असूनही पदाधिकारी निद्रिस्थ असल्याचे नागरिकांकडून बोलल्या जात आहे.

पाण्याच्या टाकीचे क्षतिग्रस्त झालेले पिल्लर *(छाया : सचिन ढोके)*

रेवसा येथे गावाकडून परतवाडा मार्गावर जाणाऱ्या रस्त्याच्या कडेवरील झोपडपट्टीत पाणीपुरवठा करणारी पाण्याची मोठी व उंच टाकी आहे. ती टाकी खुप जुनी असल्याने ती आता शिकस्त झाली आहे. टाकीचे चारही खांब कमकुवत झाल्याने ठिकठिकाणी भेगा पडल्या आहे. अनेकवेळा टाकीच्या वरच्या भागावरून सिमेंटचा भाग खचून खाली पडला आहे. याच टाकीखाली पाणीपुरवठा कर्मचारी आपल्या कुटुंबासह राहतात. तसेच टाकीलगतच प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी तसेच जि.प. शाळासुद्धा आहे. टाकी दुर्दैवाने कोसळल्यास यामध्ये फार मोठी हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ग्रामपंचायत तसेच संबंधित पाणीपुरवठा विभागाने तात्काळ दखल घेऊन ही टाकी पाडावी, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

नवी बांधलेली टाकी मात्र रिकामी

रेवसा येथेच एकीकडे शिकस्त टाकीवरून पाणीपुरवठा होत असताना दुसरीकडे नवीन बांधकाम झालेली टाकी रिकामी असल्याने ती 'शोभेची वास्तू' ठरली आहे. लाखो रूपये खर्च करून जीवन प्राधिकरण विभागाने या टाकीचे बांधकाम केले; मात्र त्यामधून अद्यापही पाणीपुरवठा सुरू झाला नाही.

अ मरावती मनोरंजन

चित्रपटगृह	चित्रपट	वेळ
चित्रा	टर्मिनेटर जेनिसीस	१२।, ३।, ६।, ९।,
राजलक्ष्मी	किल्ला, शटर ओपन	१२।, ३।, ६।, ९।
प्रिया	गुड्डू रंगीला	१२।, ३।, ६।, ९।
प्रभात	एबीसीडी २	१२।, ३।, ६।, ९।
सरोज	रूम द मिस्ट्री	१२।, ३।, ६।, ९।
ई-ऑरबीट	ऑनलाईन बिनलाईन	१२।,३।, ६।, ९।
	किल्ला	१२।,३।, ६।, ९।
	गुड्डू रंगीला	१२।।, ३।।, ६।।, ९।।
	टर्मिनेटर जेनिसीस	१२।।, ३।।, ६।।, ९।।
बीग सिनेमा	किल्ला, एबीसीडी २	३।।, ६।।, ९।।
बीग सिनेमा२	टर्मिनेटर जेनिसीस	३।।, ६।।, ९।।

सातवे पुण्यस्मरण

स्व. स्तुती विजय भटकर

जन्म दिनांक - ३/३/२००३ मृत्यू - ७/७/२००८

स्तुती,
येणारा दिवस कधीच तुझ्याशिवाय जात नाही
कु.स्तुती विजय भटकर दिवस जरी गेला तरी तुझी आठवण जात नाही.

सोबत
■ श्री. विजय के. भटकर (वडील) ■ सौ. स्वाती विजय भटकर (आई)
■ चि. स्तवन विजय भटकर (भाऊ) ■ समस्त भटकर व सालवे परिवार वरूड

सोलर प्रोत्साहन योजना
■ एका भाग्यवान ग्राहकास सोलार फक्त ४९४५" मध्ये
■ ९ जणांना प्रत्येकी रु. १००० प्रोत्साहन भेट
■ घरपोच सेवा व सिस्टीम इन्स्टॉलेशन फ्री
■ ० % व्याजदराने अर्थसाह्य उपलब्ध
Sudarshan Saur SOLAR WATER HEATER
प्रो. प्रा. राज बारब्दे
मदन महल दु. १२९, १३० परतवाडा / अंजनगाव
मो. ९८५०६८२२०९, ९८२२५२७२१६